आजचा सुविचार
काळा रंग हा अशुभ समजला जातो.
पण प्रत्येक काळा रंगाचा
फळा हा अनेक विद्यार्थांचे
आयुष्य उजलवत असतो...

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मिडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २४०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## पुणे मेट्रोची क्षमता दुप्पट होणार! शहरात धावणार ६ डब्यांची मेट्रो

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, पुणे :** पुणे मेट्रोच्या दोन मार्गिकांवर सध्या दिवसाला सरासरी दोन लाख प्रवासी प्रवास करीत असून, हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो कार्यान्वित झाल्यानंतर मेट्रो प्रवाशांची संख्या आणखी वाढणार आहे. सकाळी-सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत त्यात आणखी भर पडण्याची शक्यता गृहीत धरून मेट्रोच्या डब्यांची संख्या तीनवरून सहापर्यंत वाढविण्यासाठी 'महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन'ने (महामेट्रो) तयारी सुरू केली आहे.



सहा डबे करण्यासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम सुरू असून, भविष्यातील गरजा लक्षात घेऊन लवकरच त्याबाबतचा निर्णय घेण्याचे स्पष्ट संकेत 'महामेट्रो'चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी शुक्रवारी (१० एप्रिल) दिले. 'मेट्रोला होणारी सध्याची गर्दी लक्षात घेऊन विस्तारित मार्गिकांसाठी दोन टप्प्यांत अनुक्रमे १२ व १५ ट्रेन नव्याने दाखल होणार आहेत. त्याशिवाय, मेट्रोच्या डब्यांची संख्या तीनवरून सहापर्यंत वाढविण्यासाठी 'अर्बन मास ट्रान्झिट कंपनी' (यूएमटीसी) यांच्याकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेण्यात येत आहे,' अशी माहिती हर्डीकर यांनी माध्यमांना दिली. मेट्रोच्या विस्तारित मार्गिकांसह टप्पा-२ मधील सर्वच मार्गांची कामे २०३० अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**'महामेट्रो' व 'एसटी'त करार**

शिवाजीनगर येथील बस स्थानक उभारण्यासंदर्भात 'महामेट्रो' व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी) यांच्यातील कराराचा मसुदा अंतिम झाला आहे. तो मसुदा एसटी महामंडळाच्या पुढील बैठकीत मंजुरीसाठी मांडण्यात येणार आहे. त्यानंतर शिवाजीनगर येथील एसटी स्थानकासाठी निविदा काढून त्याच्या पुढील कामाला गती देण्यात येणार आहे. या ठिकाणी एसटी स्थानक व बस पार्किंग उभारले जाणार आहे; तसेच पीपीपी तत्त्वावर जागेचा विकास केला जाणार आहे,' असे हर्डीकर यांनी सांगितले.

उत्पन्न-खर्चाचा ताळमेळ

पुणे मेट्रोतून प्रवास करणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढत असून, गेल्या आर्थिक वर्षात मेट्रोच्या दोन्ही मार्गिकांवरून सात कोटी आठ लाख प्रवाशांनी प्रवास केला आहे. पुणे मेट्रोला केवळ तिकिटांतून ११२ कोटी रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. याशिवाय, तिकिटांशिवायच्या इतर उत्पन्न स्रोतांद्वारे (नॉन फेअर बॉक्स) २१ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. त्यामुळे वर्षभरात १३३ कोटी रुपयांची भर मेट्रोच्या तिजोरीत पडली आहे. याच दरम्यान मेट्रोचा संचलन खर्च जवळपास १५० कोटी रुपये आहे. सरकारकडून मुद्रांक शुल्कावरील एक टक्का अधिभाराची रक्कम थेट कर्जफेडीसाठी वापरली जात असल्याने मेट्रोच्या हिशोबात ती धरण्यात येत नाही.

## मुंबईत आज रेल्वेच्या तिन्ही मार्गांवर मेगाब्लॉक

**अक्षराज : संजय पंडित**




**दि.११, मुंबई :** मुंबईकरांना दर रविवार प्रमाणे आज रविवार दि.१२ एप्रिल २०२६ रोजी मध्य रेल्वेने अभियांत्रिकी काम काजासाठी मेगाब्लॉकचे नियोजन केले आहे. त्यामुळे लोकल गाड्या उशीराने धावणार असल्याने लोकलला गर्दी होण्याची शक्यता आहे. दर रविवारी अभियांत्रिक आणि देखभालीचे काम करण्यासाठी मेगाब्लॉकचे नियोजन केले जाते. सोमवार ते शनिवार कामकाजाच्या दिवसात लोकलची वाहतूक सुरळीत चालण्यासाठी या मेगाब्लॉकचे आयोजन केले जात असते.

मध्य रेल्वे, मुंबई विभागात आज रविवार दि. १२ एप्रिल २०२६ रोजी विविध अभियांत्रिकी आणि देखभाल कामांसाठी उपनगरी मार्गांवर मेगा ब्लॉक परीचालीत करणार आहे.

दरम्यान या मेगाब्लॉकचा तपशील पुढीलप्रमाणे असणार आहे.

**मेन लाईन :** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई – विद्याविहार दरम्यान अप आणि डाऊन धिम्या मार्गावर

वेळ: सकाळी १०.५५ वा.ते दुपारी ३.५५ वाजेपर्यंत.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सकाळी १०.४८ वा. ते दुपारी ३.४५ वाजेपर्यंत सुटणाऱ्या डाऊन धिम्या मार्गावरील लोकल फेऱ्या सीएसएमटी- मुंबई ते विद्याविहार दरम्यान डाऊन जलद मार्गावर वळविण्यात येतील. या लोकल ट्रेन भायखळा, परळ, दादर, माटुंगा, शीव आणि कुर्ला स्थानकांवर थांबतील आणि पुढे विद्याविहार येथे पुन्हा डाऊन धिम्या मार्गावर वळविण्यात येतील. त्यामुळे या लोकल करी रोड, चिंचपोकळी, मस्जिद, सँडहर्स्ट रोड येथे थांबा घेणार नाहीत.

घाटकोपर येथून सकाळी १०.१९ वाजता ते दुपारी ३.५२ वाजेपर्यंत सुटणाऱ्या अप धिम्या मार्गावरील लोकल फेऱ्या विद्याविहार ते सीएसएमटी- मुंबई दरम्यान अप जलद मार्गावर वळविण्यात येतील. या लोकल गाड्या कुर्ला, शीव, माटुंगा, दादर, परळ आणि भायखळा स्थानकांवर थांबतील. त्यामुळे या लोकल करी रोड, चिंचपोकळी, मस्जिद, सँडहर्स्ट रोड येथे थांबा घेणार नाहीत.

**हार्बर लाईन मेगाब्लॉक :**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – चुनाभट्टी -वांद्रे (डाऊन)

वेळ: सकाळी ११.४० वा. ते सायंकाळी ४.४० वाजेपर्यंत

चुनाभट्टी -वांद्रे – छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (अप)

वेळ: सकाळी ११.१० ते सायंकाळी ४.१० वाजेपर्यंत

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सकाळी ११.१६ वा. ते सायं.४.४७ वाजेपर्यंत वाशी -बेलापूर -पनवेलकडे जाणाऱ्या डाऊन मार्गावरील हार्बर लोकल फेऱ्या रद्द राहतील. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सकाळी १०.४८ वा. ते सायं. ४.४३ वाजेपर्यंत वांद्रे- गोरेगावकडे जाणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावरील लोकल फेऱ्या रद्द राहतील.

पनवेल – बेलापूर -वाशी येथून सकाळी ९.५३ वा. ते दुपारी ३.२० वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे येणाऱ्या अप हार्बर मार्गावरील लोकल फेऱ्या रद्द राहतील.

गोरेगाव – वांद्रे येथून सकाळी १०.४५ वा. ते सायंकाळी ५.१३ वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस कडे येणाऱ्या अप हार्बर मार्गावरील लोकल फेऱ्या राहतील.

ब्लॉक कालावधीत पनवेल ते कुर्ला (प्लॅटफॉर्म क्र.८) दरम्यान विशेष गाड्या चालविण्यात येतील.

हार्बर मार्गावरील प्रवाशांना ब्लॉक दरम्यान सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत मेन लाईन आणि पश्चिम रेल्वे मार्गे प्रवास करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

## शुद्ध सोन्याच्या नावाने २.८८ कोटींची फसवणूक; सराफाचे २ किलो सोने लंपास

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, छत्रपती संभाजीनगर :** शहरातील कासारी बाजार येथील एका सोनाराचा विश्वास संपादन करून गुजरात राजकोट येथील एका सोन्याचे दागिने तयार करणाऱ्या कंपनीने तब्बल २ कोटी ८८ लाख २९ हजार ९६० रुपयाचे २ किलो शुद्ध सोने घेतले. सोने पुन्हा मागणाऱ्या सोनाराला महाराष्ट्रात जाऊ देणार नाही, अशी धमकी देत जीवे मारण्याची धमकी दिली. जयदीप हरकिशन झिंझुवडिगा, विशाल हरकिशन झिंझुवडिगा आणि कल्पेश झिंझुवडिगा (सर्व रा. राजकोट, गुजरात) अशी फसवणूक करणाऱ्यांची नावे आहेत.

या प्रकरणात आतिष सुभाष सवईवाला (रा. गांधी निवास, कासारी बाजार) यांनी तक्रार दिली. त्यांचा कासारी बाजार येथे सोन्या चांदीचे दागिने विक्रीचा व्यवसाय आहे. सवईवाला आणि राजकोट येथील जयदीप झिंझुवडिगासह अन्य दोघांशी दहा वर्षांपासून व्यावसायिक संबंध आहेत. २६ जानेवारी २०२६ रोजी हे तीनही व्यापारी शहरात आले. आम्ही तीन टक्क्यांऐवजी १.५ टक्के मजुरीवर शुद्ध सोन्यापासून



दागिने बनवून देऊ, असे आमिष सवईवाला यांना दाखवले. जुने संबंध असल्याने त्यांनी तिघांवर विश्वास ठेवला.

सोन्याचे दागिने तयार करण्यासाठी दोन किलो सोने, चांदी परत दिले नाही. तसेच खोट्या केसमध्ये अडकाविण्याची धमकी देत, जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या झिंझुवडिगा (सर्व रा. राजकोट, गुजरात) यांच्याविरोधात सिटीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक श्रीनिवास रायलवार हे करीत आहेत.

**महाराष्ट्रात जाऊ न देण्याची धमकी**

राजकोटच्या पोलिस ठाण्यात गेल्यानंतर तिथे झिंझुवडिगा आणि त्यांच्यासोबत असलेल्या १०-१५ जणांनी सवईवाला यांना ठार मारण्याची धमकी दिली. अपहरणाचा गुन्हा दाखल होईल या भीतीने तक्रारदार छत्रपती संभाजीनगरला परतले. त्यानंतरही फोनवर 'सोने मागायला राजकोटला आल्यास जिवंत महाराष्ट्रात जाणार नाही, अशी धमकी आरोपींनी दिली.

**दोन किलोहून अधिक शुद्ध सोने दिले...**

सवईवाला यांनी त्यांच्या ताब्यातील १६९५ ग्रॅम सोनेवीट, २२६.११० ग्रॅम चांदी आणि ९६.९०० ग्रॅम तांबे असे एकूण २०१८.८९० ग्रॅम सोने, चांदी आणि तांबे मिश्रण दागिने बनवण्यासाठी झिंझुवडिगा यांच्याकडे दिले. २० ते २५ दिवसांनंतरही दागिने मिळाले नाहीत, तसेच झिंझुवडिगा यांचे फोन बंद येऊ लागल्याने सवईवाला यांना संशय आला. २४ फेब्रुवारी रोजी ते मित्र मच्छिंद्र नलावडे यांच्यासोबत राजकोटला गेले. तिथे गेल्यावर 'आमचे कामगार सर्व सोने चोरून घेऊन गेले', अशी उडवाउडवीची उत्तरे आरोपींनी दिली.

## महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मरणार्थ चंद्रपुरात भव्य आर्ट गॅलरी उभारणार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. ११, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मरणार्थ चंद्रपुरात भव्य आर्ट गॅलरी (कला दालन) उभारण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त चंद्रपूर येथे आयोजित कार्यक्रमात आ. मुनगंटीवार यांनी केलेली घोषणा सर्वांचे लक्ष वेधणारी ठरली. माळी समाजाच्या वतीने करण्यात आलेल्या मागणीला आ. मुनगंटीवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्यामुळे समाजाकडून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त होत आहे. या माध्यमातून क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रसार होऊन नव्या पिढीला प्रेरणा मिळेल, असा विश्वासही आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

बालाजी वॉर्ड येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त सांस्कृतिक महोत्सव आणि सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी महापौर संगीता खांडेकर, उपमहापौर प्रशांत दानव, माळी समाजाचे अध्यक्ष राजू बनकर, नंदू नागरकर, विजय राऊत, राहुल पावडे, मनस्वी गीऱ्हे, डॉ. मंगेश गुलवाडे, विशाल निंबाळकर, भालचंद्र दानव, संजीवनी वासेकर, वैशाली महाडोळे, शीतल गुरनूले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विचार मांडताना आ. मुनगंटीवार म्हणाले, 'माळी समाजाचे पदाधिकारी राजू बनकर, उपमहापौर प्रशांत दानव, नंदू नागरकर आणि समाजाचे अन्य पदाधिकारी माझ्या चंद्रपूर येथील जनसंपर्क कार्यालयात भेटण्यासाठी आले असता त्यांनी या आर्ट गॅलरीची मागणी केली होती. त्यानुसार आज क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून यासंदर्भात घोषणा करताना मला अत्यंत आनंद होत आहे. समाजाच्या भावना आणि क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव जपण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरेल.'

आ. मुनगंटीवार यांनी महात्मा फुले यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, 'केवळ जयंती साजरी करून चालणार नाही, तर त्या निमित्ताने समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय, हक्क आणि संधी पोहोचवण्यासाठी संकल्प करण्याची गरज आहे. प्रत्येक समाजाची प्रगती झाल्याशिवाय देशाची प्रगती शक्य नाही.' समाजात एकजूट, सामाजिक बांधिलकी आणि नीतिमत्तेचे महत्त्वही त्यांनी पटवून दिले.

**क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या वंशजांना न्याय...**

. क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या वंशजांबाबत बोलताना आ. मुनगंटीवार यांनी सांगितले की, पुण्यातील ऐतिहासिक भिडे वाडा स्मारकाच्या जतन व उभारणीचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित होता. हा विषय सर्वप्रथमच प्रभावीपणे विधानसभेत मांडत मी सरकारचे लक्ष वेधले आणि त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा केला. केवळ विधानसभेत मुद्दा उपस्थित करून न थांबता प्रत्यक्ष स्थळाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला व स्मारकाच्या उभारणीतील अडथळे दूर करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

तसेच, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या वंशजांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचाही त्यांनी उल्लेख केला. ते म्हणाले, '२०१३ मध्ये नागपूर अधिवेशनादरम्यान उपोषणाला बसलेल्या वंशजांची भेट घेऊन त्यांचा प्रश्न शासनापर्यंत पोहोचवला.




त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून संबंधित वारसदारांचा तपास करून घेण्यात आला व ते खरे वारस असल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबातील सदस्याला नोकरी मिळवून देण्यासाठी स्वतः पुढाकार घेतला. हा प्रश्न सोडवताना शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करून सामाजिक न्याय देण्याचा प्रयत्न केला.'

**'भारतरत्न' साठी सातत्यपूर्ण पाठपुरावा...**

. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना देशातील सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' प्रदान करण्यात यावा, ही मागणी देखील आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत ठामपणे मांडली. या संदर्भात त्यांनी १७५ आमदारांच्या स्वाक्षऱ्या घेऊन ठरावाला व्यापक पाठिंबा मिळवला. राज्य विधानमंडळाच्या सभागृहांची मान्यता सदर प्रस्तावाला मिळाली आहे. यासाठी आ. मुनगंटीवार यांनी पाठपुरावा केला असून, देशगौरव पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना देखील याबाबत पत्र पाठवण्यात आले आहे. फुले दांपत्याचे कार्य केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी आहे. शिक्षण, स्त्री सक्षमीकरण, सामाजिक समता आणि शोषितांच्या हक्कांसाठी त्यांनी दिलेले योगदान अमूल्य आहे. त्यामुळे त्यांना भारतरत्न देऊन सन्मानित करणे हे देशाचे कर्तव्यच आहे, असा ठाम विश्वास आ. मुनगंटीवार त्यांनी व्यक्त केला आहे. तसेच, या मागणीसाठी आपला सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**'तरुणांनो, सामाजिक बदलासाठी सर्वांनी एकत्र या'**

तरुणांना उद्देशून शिक्षणासोबतच स्टार्टअप, स्वावलंबन आणि नेतृत्व विकासावर भर देण्याचे आवाहन आ. मुनगंटीवार यांनी केले. समाजातील व्यसनमुक्ती, गरजू कुटुंबांना मदत आणि सकारात्मक सामाजिक बदलासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

व्यक्तीपेक्षा विचार मोठा, विचारापेक्षा समाज मोठा आणि समाजापेक्षा देश मोठा आहे, या विचारांचा पुनरुच्चार करत त्यांनी सामूहिक हिताला प्राधान्य देण्याचे आवाहन त्यांनी केले. यानिमित्ताने उत्कृष्ट सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यासाठी आयोजकांचे आ. मुनगंटीवार यांनी विशेष अभिनंदन केले तसेच सहभागी कलाकारांचे कौतुक केले.




## सारे काही ऊर्जासुरक्षेसाठी

काही राज्यांमध्ये निवडणुकीची रणधुमाळी चालू आहे. देशाच्या कित्येक भागात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे, पिके मातीमोल होत आहेत. उन्हाच्या कडाक्याने तर किती तरी भाग भाजून निघत आहे. पण सर्वांना चिंता लागून राहिली आहे ती आपल्या चुलीची. ती पेटवण्यासाठी इंधन कुठून आणायचं, हा सवाल आहे. मध्यपूर्वेत चाललेले युद्ध आपण सुरू केलेले नाही, की त्यात आपला काही सहभाग नाही. तरी त्याची झळ स्वयंपाकघरापर्यंत पोचते आहे. उपाहारगृहांनाही त्याची लागण झाली आहे. ती बंद पडत आहेत. गरिबांचे अन्न असलेल्या पावाचेही कदाचित उद्या रेशनिंग करावे लागेल की काय, अशी भीती आहे.

या सर्वांच्या मुळाशी आहे तो घराघरात जास्त वापरला जाणारा एलपीजी वायू. त्याचा पुरवठा करणाऱ्या सिलिंडरचा तुटवडा असल्याची जनसामान्यांची भावना आहे. ती खरी की, केवळ अफवा या वादात पडले नाही, तरी देशाच्या कित्येक भागात तो मिळवण्यासाठी लांबच्या लांब रांगा लागल्याची चित्रे दररोज बघायला मिळताहेत. या परिस्थितीवर मात करण्यासाठी सरकार पीएनजी, म्हणजे पाइप्ड नैसर्गिक वायूकडे वळण्याचा आग्रह धरत आहे. ज्यांच्या घरात याची जोडणी मिळालेली आहे त्यांनी त्यांच्याकडचे एलपीजी सिलिंडर देऊन टाकावेत; तसे न केल्यास त्यांना त्याचा पुरवठा होणार नाही, असेही फर्मान काढलं गेलं आहे.

साहजिकच एकंदरीतच इंधनाची चणचण असताना, हा काय आणि तो काय, कोणताही वायू वापरून काय होणार आहे, हा सवाल हॅम्लेटच्या बापाच्या समंधासारखा डोके वर काढत आहे. त्याचे सरळ साधे उत्तर आहे की, हे दोन वायू वेगवेगळे आहेत. त्यांचे रासायनिक स्वरूप, तयार करण्याची पद्धत, गुणधर्म, उपयोग आणि मर्यादा वेगवेगळे आहेत. त्यामुळं त्यांना एकाच पारड्यात घालता येणार नाही.

एलपीजी हे लिक्विफाइड पेट्रोलियम गॅसचे लघुरूप आहे. त्याच्या नावावरूनच कळून येते की हा वायू पेट्रोलियमच्या उत्पादनातूनच मिळतो. तो मुख्यत्वे प्रॉपेन आणि ब्युटेन या वायूंचे मिश्रण आहे. कच्च्या तेलाचे शुद्धीकरण करताना त्याचे आनुषंगिक उत्पादन होते. तो दाबाखाली ठेवला की त्याचे द्रवस्थितीत रूपांतर होते. कोणत्याही वायूची घनता त्याच्या द्रवरूपापेक्षा कमी असते. तो हलका असतो. त्यामुळं तो अधिक जागा व्यापतो. साधे पाणी घ्या. पेलाभर पाण्याची वाफ खोलीभर पसरते. या वायूबाबतीतही असेच होते. उच्च दाबाच्या प्रभावाखाली त्याचे द्रवस्थितीत रूपांतर होते. त्याबरोबर तो कमी जागा व्यापतो आणि सिलिंडरमध्ये भरता येतो.

एलपीजीचा उष्मांक जास्त असल्यामुळे कमी वापरातही जास्त उष्णता मिळते. म्हणूनच स्वयंपाकासाठी तो अत्यंत कार्यक्षम ठरतो. त्याचे आणखी फायदे म्हणजे त्याची सहज वाहतूक करता येता, तो सिलिंडरमध्ये साठवता येतो आणि त्याचे ज्वलन तुलनेने स्वच्छ असते. तरीही तो जीवाश्म इंधन असल्यामुळे कार्बन डायऑक्साइडचं उत्सर्जन करतोच. शिवाय त्याची घनता हवेच्या घनतेच्या दीडपट ते दुप्पट असल्यामुळे गळती झाल्यास तो जमिनीवरच साचून राहतो. तिथेच त्याचे ज्वलन होऊन आग लागण्याची किंवा स्फोट होण्याची शक्यता वाढते. म्हणूनच वापरताना काळजी घेणे गरजेचे ठरते. त्याची जोडणीही काळजीपूर्वक करावी लागते. आणि स्वयंपाकघरात योग्य वायुविजन असणेही आवश्यक ठरते. त्याव्यतिरिक्त याच्या निर्मितीसाठी कच्च्या तेलाच्या शुद्धीकरणावर अवलंबून राहावे लागत असल्यामुळे त्या कच्च्या तेलाचा तुटवडा झाला किंवा शुद्धीकरणाच्या सुविधा कमी पडल्या की याचीही टंचाई भासू लागते.

याउलट पीएनजी म्हणजे 'पाइप्ड नॅचरल गॅस'. हा नैसर्गिक वायू, म्हणजे मुख्यतः मिथेन आहे. त्याचे द्रवरूपात अवस्थांतर न करता वायुरूपातच तो पाइपलाइनद्वारे थेट घरांपर्यंत पोहोचवता येतो. अर्थात सिलिंडरची गरज राहत नाही. स्वयंपाकासाठी हा अत्यंत सोयीस्कर ठरतो, गॅस संपण्याची चिंता नाही, बुकिंगची गरज नाही. पीएनजीचे फायदे म्हणजे सातत्यपूर्ण पुरवठा, एलपीजीसारखा त्याच्यावर अतिरिक्त दाब नसल्यामुळे तो सुरक्षित आहे. त्याव्यतिरिक्त त्याचे स्वच्छ ज्वलन होते. कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन कमी होते. परिणामी प्रदूषणाची समस्या उद्भवत नाही. हा वायू हवेपेक्षा हलका असल्यामुळे गळती झाल्यास तो हवेत पसरतो. हा वायू असा बहुगुणी असला तरी त्याच्या उपलब्धतेसाठी मोठे पायाभूत जाळे उभारावे लागते, जे सध्या भारतात हळूहळू वाढत आहे. शहरांमध्ये त्याचा प्रसार होत असला तरी ग्रामीण भागात तो अजून मर्यादित आहे.

या नैसर्गिक वायूवरच २०० ते २५० बार इतका उच्च दाब दिला की त्याचं सीएनजी म्हणजे कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅसमध्ये रूपांतर होते. तो टाक्यामध्ये साठवता येतो. मात्र, त्यासाठी तो दाब सहन करणाऱ्या मजबूत टाक्यांची गरज असते. हा गॅस सध्या तरी वाहनांसाठी पेट्रोल किंवा डिझेल यांना पर्याय म्हणून वापरला जातो. त्यासाठी या वाहनांमध्येही वेगळी व्यवस्था करावी लागते. काही वाहने हायब्रिड रूपात पेट्रोल किंवा डिझेलबरोबर या गॅसचाही वापर करू शकतात.

# श्रद्धा आणि अंधश्रद्धा...!! बाबा, बुवा...भक्तीचा बाजार मांडतांना दिसतात

...आज श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्यात संघर्ष म्हणण्यापेक्षा मतभेद असल्याचे जाणवून येते. ज्या गोष्टी श्रद्धेने केल्या जातात, त्या अंधश्रद्धा असल्याचे सांगितले जाते. मुळात हा अतिशय संवेदनशील प्रश्न आहे. श्रद्धा आणि अंधश्रद्धेला काय म्हणावे किंवा कोणत्या गोष्टी अंधश्रद्धा आहेत हे ती बाब स्पष्ट झाल्याशिवाय समजून येत नाही. अगदी ताजे उदाहरण म्हणजे नुकताच उघड झालेले रमेश खरात प्रकरण. तो जे करत होता ती निव्वळ अंधश्रद्धा होती हे कदाचित अनेकांनी समजूनसुद्धा त्याचा नाद सोडला नाही. त्याच्या जाळ्यात कोणकोण अडकले होते ते आता स्पष्ट होत आहे.साध्या गोष्टी लक्षात घेतल्या तरी आपल्याही लक्षात येईल, की या अंधश्रद्धा आहेत. उंबरठ्यावर शिंक आली असता काम होत नाही असे मानले जाते. मुळात शिंक येणे ही काही अंधश्रद्धा नाही. यामागे असलेली शास्त्रीय कारणे शाळेत असतानाच शिकलेली असतात. पण शिंक आली असता कामे होत नाही अशी मानसिकता लहानपणापासून मनात बसली असल्यामुळे आपण थोडे थांबतो. शिंक आल्यावर दोन पावले मागे येऊन मग बाहेर पडावे असे सांगितले जाते.




शिवाय जवळपास ज्याने शिंक दिली त्यालाही दोन शब्द ऐकवले जातात. महत्त्वाच्या कामात विघ्न आणले असे सुनावले जाते. परंतु शिंक येणे हा नैसर्गिक प्रकार असून शिंकल्याने काही अघटित होत नाही किंवा कोणत्या अडचणीही येत नाही हे लक्षात घेणे आवश्यक आहे.भूत असणे हा एक प्रकार लोकांच्या मनात घर करून बसला आहे. विशेषतः स्मशानात भुतं असतात असा लोकांचा ठाम समज असतो. यासाठी काही संस्थांतर्फे जनजागरण करण्यात आले असले तरी ही भीती कुठेतरी मनात घर करून राहिली असतेच. त्यातच चिंचेच्या झाडावर भुतं असतात हा ठाम विश्वास असतो.

मुळात दाट पानांच्या झाडांवर पक्षी घरटे बांधतात. त्यांचा निवास त्या झाडांवर असताना भुतं कशाला त्या झाडांवर राहतील? आणि आधी ती असायला तर पाहिजेत. याबाबतीत गोंदमाळ येथील एक जुनी घटना आठवते. साधारण २० वर्षापूर्वीची ही घटना असेल. गोंदेमाळ गाव डोंगराळ भागात वसले आहे. रात्री भुतांची पालखी डोंगरात नाचते असा अनेक जणांचा समज झाला होता. रात्रीच्या वेळी ठिणग्या उडणे, ज्वाळा दिसणे असे प्रकार तेथे दिसायचे. लोकांना वाटायचे तेथे भुतांचे राज्य आहे. रात्री त्यांचा दरबार भरत असेल. पण अंधश्रद्धा निर्मूलन समितीने या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावायचे ठरवले. त्यांनी प्रत्यक्ष रात्री जाऊन तो प्रकार उघडकीस आणला. रात्री तेथे हातभट्टी दारू गाळण्याचा व्यवसाय चालायचा. त्यासाठी भट्टी पेटवली जायची. त्या भट्टीतील निखारे उडायचे. त्यामुळे आग आणि निखारे




दिसायचे. समितीने पोलिसांच्या सहकार्याने तो प्रकार उघड करून लोकांना या अंधश्रद्धेपासून परावृत्त केले.मुळात आपले मन विचारी असते. पण एखादी गोष्ट मनाशी पक्की ठरवली, की त्याचा सहसा प्रतिवाद केला जात नाही कारण त्या गोष्टीचा ठसा मनावर पक्का उमटलेला असतो. जादूगार जादू करतो. त्यामागे कोणताही चमत्कार नसतो. हातचलाखी आणि शब्दांच्या ओघात प्रेक्षकांना खिळवून ठेवत जादूगार जादू दाखवत असतो. त्याचे कारण विज्ञान हेच असते. आज अनेक बाबा,बुवा भक्तीचा बाजार मांडतांना दिसतात. त्यांना ओळखणे महत्त्वाचे आहे. आजही गोंदवले, शिर्डी, शेगाव, अक्कलकोट अशा ठिकाणी कोणत्याही शुल्काशिवाय किंवा देणगीशिवाय भाविकांना दर्शन घेता येते. या ठिकाणी विनामूल्य महाप्रसाद भाविकांना दिला जातो. तरीही कामतसारख्या भोंदूकडे लोक का वळतात हे न समजणारे कोडे आहे. मुळात या बाबा लोकांना अंगमेहनत करायची सवय नसते. विनासायास पैसा मिळवायचा असतो. भाविकांच्या लक्षात या गोष्टी येतात, पण त्यावेळी उशीर झालेला असतो. श्रद्धा अवश्य असावी, पण ती डोळस असावा..!!

# 'नेशन बिल्डर' महात्मा फुले

११ एप्रिल १८२७ साली महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म पुणे येथे झाला.


महात्मा फुले हे कोमल प्रवृत्तीचे नव्हते; ते धाडसी, करारी आणि निग्रही होते. स्वाभिमानी होते. अन्याय पाहून 'जगात असा अन्याय होतच असतो!', 'असेच चालत असतं', असं म्हणणारे ते नव्हते. जिथे जिथे अन्याय दिसेल, तेथे तेथे तो निपटून काढला पाहिजे, असा त्यांचा बाणा होता. त्यांचा हा बाणा त्यांनी अखंड जीवनभर पाळला. त्यांनी थॉमस पेन, छत्रपती शिवाजी महाराज आणि जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या जीवनापासून प्रेरणा घेतली होती.शिक्षण तज्ञ,कृषी तज्ञ, अर्थतज्ञ, आधुनिक नाटककार, निबंधकार, आध्य शिवचरित्रकार, आधुनिक मराठी कवितेचे जनक ,पुण्याचे आयुक्त,पुणे कमर्शियल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनीचे कार्यकारी संचालक आणि प्रकाशक म्हणून त्यांनी भारतीय समाजावर आपली कलदार नाममुद्रा उमटवली. खऱ्या अर्थाने त्यांनी मानवी व्यवहाराचे सर्व अंगे व्यापली होती. म्हणजेच ते सर्वव्यापी होते.

महात्मा फुले यांनी 'अज्ञान' हे दुःखाचे कारण आहे, असे सांगितले. त्यासाठी महात्मा फुले म्हणतात–

**विद्येविना मती गेली।**
**मतीविना नीती गेली।**
**नीतीविना गती गेली।**
**गतीविना वित्त गेले।**
**वित्ताविना शूद्र खचले।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।**

म्हणजेच अनर्थ घडवणारी अविद्या आहे. दुःख देणारी अविद्या आहे. मती( बुद्धिमत्ता), नीती( नैतिक मूल्य व भावनिक प्रगल्भता), गती( सर्वार्थाने प्रगती) आणि वित्त ( धनसंपत्ती) हे साध्य न करता आल्यामुळे शूद्र लोक खचले अर्थातच दुःखी झाले; आणि या दुःखाचे कारण अर्थातच अविद्या( अज्ञान) आहे. अशी मांडणी महात्मा फुले यांनी त्याकाळी केली. भारतीय चातुवर्णीय व्यवस्थेने शूद्रांना आणि स्त्रियांना ज्ञानापासून वंचित ठेवले. त्यांना दुःखी बनवले. तेव्हा त्यांना दुःखमुक्त करण्यासाठी शिक्षणाच्या प्रवाहात आणले पाहिजे; हे ओळखून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले आणि त्यांच्या ब्राह्मण व ब्राह्मणेतर सहकाऱ्यांनी शाळा काढल्या.

'स्त्रिया शिकल्या की धर्म बुडेल,संस्कृती रसातळाला जाईल', या सनातनी विचारांचा महात्मा




फुले व सावित्रीबाई फुले यांनी प्रखर विरोध केला. वडिलांनी त्यांना घराबाहेर काढले, तरी स्त्री शिक्षणाचे काम त्यांनी चालूच ठेवले. या पती-पत्नींना विलक्षण हाल अपेष्टा सोसाव्या लागल्या. पुढे त्यांनी १८४८ मध्ये भिडे वाड्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली. या मुलींच्या शाळेची पहिली परीक्षा झाली,तेव्हा ती बघायला पुण्यातील ३००० हून अधिक लोक जमले होते. प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या मुक्ता साळवे या मुलीने इंग्रजीत मागणी केली की,आम्हाला खाऊ,खेळणी,कपड्यांचे बक्षीस नको; मला शालेय ग्रंथालय पाहिजे. तिच्या मागणीवरून फुले दापत्यांनी पहिलं भारतीय शालेय ग्रंथालय १८५२ साली उभं केलं. पुढे जाऊन याच मुक्ता साळवे या मातंग विद्यार्थिनीने १८५५ 'ज्ञानोदय' या वर्तमानपत्रातून 'मांग-महारांच्या दुःखाविषयी निबंध'

लिहिला. दलित स्त्रियांना उघड्यावर बाळंतपणाला सामोरे जाताना सोसाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांचे मुक्तानं केलेले वर्णन डोळ्यात पाणी आणते.'आम्हाला जर वेदांचा अधिकार नाही तर आमचा धर्म कोणता?',असा प्रश्न विचारण्याचे साहस आणि प्रगल्भता महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षण कार्यामुळे तिच्यामध्ये आली होती.

महात्मा फुले यांनी १८ जुलै,१८८३ मध्ये लिहिलेल्या 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकांमध्ये 'शेतकरी सुखी व्हायची' त्रिसूत्री मांडली आहे. उत्पादन खर्चावर आधारित बाजार भाव, शेती आधुनिक पद्धतीने केली पाहिजे आणि शेती धंद्याला उद्योग-व्यापाराची जोड दिली पाहिजे, अशी ती त्रिसूत्री होती. स्वतःच्या शाळांमध्ये त्यांनी वयाच्या सहाव्या वर्षापासून सर्व मुलांना व मुलींना शेती आणि उद्योगाचे शिक्षण सक्तीचे केले होते. आजच्या काळात 'सरकारी नोकऱ्यांसाठी आरक्षण हवे', यासाठी समाजात पडलेली दुही नष्ट होण्यासाठी महात्मा फुले यांचे हे धोरण दिशादर्शक ठरेल .अशा रीतीने महात्मा फुले हे आधुनिक भारताच्या 'कृषी औद्योगिक प्रगतीचे' दृष्टे शिल्पकार ठरतात.

महात्मा फुले 'पुणे कमर्शियल अँड कॉन्ट्रॅक्टींग' कंपनीचे कार्यकारी संचालक होते. आजच्या भाषेत सांगायचे झाले तर महात्मा फुले 'बिल्डर' होते;परंतु त्यापुढे जाऊन त्यांनी केलेल्या सामाजिक, शैक्षणिक आणि लोक जागृतीच्या कार्यामुळे ते खऱ्या अर्थाने 'नेशन बिल्डर' ठरले. पुणे नगर रस्त्यावरील येरवड्याचा बंडगार्डन पूल बांधणीचे उपकंत्राट त्यांच्या कंपनीला मिळाले होते. १०० वर्षे मुदतीचा असणारा हा पूल आजही दीडशे वर्षानंतर मजबूत आहे. आजच्या बांधकाम विभागाने आणि कंत्राडदारांनी बांधकामासाठी केवळ सिमेंट, वाळू आणि खडी एवढेच लागत नसून निष्ठा, प्रामाणिकपणा आणि लोककल्याणाची तळमळ देखील त्यात मिसळावी लागते; हे महात्मा फुले यांच्या बांधकाम व्यवसायातून समजून घ्यावे.कात्रजचा बोगदा आणि खडकवासला धरणाचा कालवा ही देखील कामे त्यांनी अशाच पद्धतीने दर्जेदार केली आहेत. त्यातून मिळवलेली रक्कम सामाजिक कामासाठी मुक्त हस्ते ते खर्चात असत.

महात्मा फुले आणि सावित्रीबाईंनी स्वतःच्या राहत्या घरी फुले वाड्यात १८६३ साली 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू केले. त्यातल्याच एका काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले. या यशवंतला त्यांनी डॉक्टर केले. पुढे त्यालाच आपल्या सर्व संपत्तीचे वारसदार ठरवले.

विधवांना केशवपण करून विद्रूप केले जाई. महात्मा फुले यांचे अनुयायी व पहिले भारतातील कामगार नेते सत्यशोधक नारायण मेघाजी लोखंडे यांनी या विरोधात नाभीकांचा संप घडवून आणला. या संपाची दखल लंडनच्या वृत्तपत्रांनी घेतली होती.

महात्मा फुलेंनी शोषित आणि वंचित जनतेवर लक्ष केंद्रित करणारी एक ज्वलंत सामाजिक सुधारणावादी संस्था म्हणजेच 'सत्यशोधक समाजाची स्थापना'केली. महात्मा फुले यांचे चरित्रकार धनंजय कीर यांनी, 'आधुनिक भारतात सामाजिक चळवळ सुरू करणारी पहिली संस्था', असे सत्यशोधक समाजाचे वर्णन केले आहे.

आधुनिक नाटककार, निबंधकार शिवचरित्रकार आणि मराठी कवितेचे जनक म्हणून जोतिबा फुले यांचे कार्य नव साहित्यिकांना दिशादर्शक आहे. सण १८५५ मध्ये महात्मा फुले यांनी 'तृतीय रत्न' हे पहिले आधुनिक मराठी नाटक लिहिले. 'शिकायला चला' हा संदेश देणाऱ्या या आद्य मराठी नाटकांमध्ये नायक-नायिका,शेतकरी पती-पत्नी शेवटी जोडीने रात्र शाळेला जातात. सामाजिक उद्बोधन करणारे हे नाटक स्त्री पुरुष समानतेचा आणि शिक्षणाचा संदेश देते. त्यांनी गुलामगिरी, ब्राह्मणांचे कसब, छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पोवाडा, शेतकऱ्यांचा आसूड, पुणे सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट, सत्सार अंक एक व दोन, इशारा, ग्रामजोशासंबंधी जाहीर खबर, सार्वजनिक सत्यधर्म, अस्पृश्यांची कैफियत, हंटर कमिशन पुढे सादर केलेले निवेदन, असे विपुल साहित्य निर्माण केले. जे पुढील हजारो पिढ्यांना मार्गदर्शक ठरणार आहे.

महात्मा फुले यांनी रायगडावरील शिवसमाधी शोधून त्याच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ केला.त्यानंतर त्या शिवसमाधीची डागडुजी केली. शिवरायांना महानायक म्हणून लोकमानसात प्रस्थापित करण्याच्या हेतूने १८८० साली त्यांनी देशात पहिल्यांदा शिवजयंती उत्सव सुरू केली .

त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याला त्यांचे मित्र उस्मान शेख यांनी राहायला घर देऊन मदत केली. सावित्रीबाईंना फातिमा शेख,गणू शिवाजी मांग व धुराजी अप्पाजी चांभार या शिक्षकांनी सहकार्य केले. त्यांना शारीरिक आणि मानसिकरित्या बलवान करण्याचे काम त्यांचे गुरु लहुजी वस्ताद साळवे यांनी केले. रानबा महार, तात्यासाहेब भिडे, अण्णासाहेब चिपळूणकर ,सदाशिव गोवंडे ,मोरो विठ्ठल वाळवेकर, भवाळकर, परांजपे हे त्यांचे सहकारी विविध जाती धर्माचे नव्हे तर खुद्द ब्राह्मण वर्गातील देखील होते.

ख्यातनाम विचारवंत डॉ. रामचंद्र गुहा यांनी जोतीरावांना 'आधुनिक भारताचे शिल्पकार' मानलेले आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांना आपले गुरु मानत असत. महात्मा गांधी म्हणाले होते, ' जोतिबा फुले देश के पहिले महात्मा थे ।असली महात्मा वो ही थे।'११ मे ११८८ रोजी मुंबईतील हजारो कामगारांनी भायखळ्याला एकत्र जमून समाज क्रांतिकारक जोतिबा फुले यांना 'महात्मा' ही पदवी दिली. भारत भेटीला आलेले अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा हे महात्मा जोतिराव फुले यांनी १४७ वर्षांपूर्वी 'गुलामगिरी' हे पुस्तक अमेरिकेतील निग्रो चळवलेला अर्पण केल्याचे पाहून थक्क झाले होते.

भारतातील मानवी मुक्ती चळवळीला चालना देणाऱ्या महात्मा फुले यांना 'नेशन बिल्डर' असे संबोधने आजच्या तरुणाईला नक्कीच आवडेल. त्यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन!

**–किशोर जाधव, सोलापूर**
**मो.नं.९९२२८८२५४१**

# मोठ्या नेत्याच्या निधनानंतर होणाऱ्या पॉट निवडणूका बिनविरोध व्हाव्यात

आजपर्यंतच्या अनेक मोठ्या नेत्यांच्या निधनानंतर होणाऱ्या पोटनिवडणूका शक्यतो होऊ नयेत हा एक संकेत आहे .याला काही ठिकाणी अपवाद झाले आहेत . यावेळी बारामती येथील पोटनिवडणूक अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर घेण्याची वेळा आली . अजित दादा हे महाराष्ट्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व होते . गेली अनेक वेळा त्यांनी उपमुख्यमंत्री म्हणून उत्तम काम केले होते. गेली चाळीस वर्षे ते महाराष्ट्राच्या राजकारणात तळपत होते. बारामती विभागात त्यांचा दबदबा होता तेथे आता पोटनिवडणूक होत आहे या निवडणुकीसाठी अजित दादांच्या पत्नी सुनेत्रा पवार याना राष्ट्रवादीकडूनउमेदवारी जाहीर झाली . काँग्रेस पक्षाने आकाश मोरे याना उमेदवारी जाहीर केली .काँग्रेस पक्षाने उमेदवारी मागे घ्यावी म्हणून अनेक नेत्यांनी प्रयन्त केले. त्यामध्ये शरद पवार , राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार ,सुप्रिया सुळे तटकरे,पटेल देवेंद्र फडणवीस यांनी वेगवेगळ्या पातळीवर प्रयन्त केले . या मध्ये अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार यांनी काँग्रीस पक्षावर टीका केली त्यामुळे रोहित पवार यांनी जाहीर माफी मागितली अखेर अगदी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी आकाश मोरे यांनी माघार घेतली . तरीही अजूनही २३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत . त्यामुळे बिनविरोध निवडणूक होणार नाही पण ती एकतर्फी होईल . दुसरीकडे राहुरी येथे दिवंगत आमदार शिवाजी कार्डिले यांच्या ठिकाणी आता भाजपने अक्षय कर्डीले यांना उमेदवारी जाहीर केली आहे . तेथे आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे गोविद कोकाटे व इतर काही उमेदवार आहेत त्यांची संख्या सात आहे . नामवंत नेत्यांनी काँग्रेस पक्षाला विनंती केल्यानंतर त्बारामती येथे जरी उमेदवार रिंगणात असता तरीही काँग्रेस पक्षाला जिंकणे अवघड होते या निवडीच्या माघार प्रक्रियेत पार्थ पवार यांची काँग्रेस पक्षावरची टीका अडथळा आणणार कि काय अशी शक्यता होती पण रहित पवारांनी त्यांच्यातर्फे माफी मागून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला . राहुरी मध्ये मात्र राष्ट्रवादी पक्ष निवडणूक लढविणाऱ्यावर ठाम होता त्यामुळे तेथे भाजप विरुद्ध राष्ट्रवादी शरद पवार अशी लढत होईल तेथे सात उमेदवार रिंगणात आहेत खरे म्हणजे दोन्ही ठिकाणी बिनविरोध निवडणूक झाली असती तर बरे झाले असते. असो

**– शांताराम वाघ, पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## श्री शिवाजी विद्यालय, बुलढाणा येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, बुलढाणा :** स्थानिक श्री शिवाजी विद्यालय, बुलढाणा येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महापुरुषांच्या विचारांना उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य प्रमोद कावरे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून जयश्री एकबोटे (लेखाधिकारी), पर्यवेक्षक नितीन ढोमणे, शिक्षक प्रतिनिधी प्रा.योगेश भोंडे, शिक्षकेतर प्रतिनिधी मांगे बाबूजी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली प्राचार्य प्रमोद कावरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, महात्मा फुलेंनी विषमते विरुद्ध लढा देऊन शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. त्यांचे स्त्री शिक्षणातील आणि समाजसुधारणेतील योगदान अविस्मरणीय असून, विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल. या प्रसंगी सिद्राम बनसोडे यांनी अत्यंत प्रभावीपणे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तसेच कार्यक्रमाच्या शेवटी दीपक मजगे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजसुधारकांच्या कार्याप्रती कृतज्ञतेची भावना निर्माण झाली.

## कोक घरकुल घोटाळा स्फोटक! अधिकाऱ्यांचा निष्क्रियपणा उघड

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.११, जिंतूर :** तालुक्यातील मौजे कोक येथे २०२४-२५ मधील घरकुल योजनेत मोठ्या प्रमाणात घोटाळा झाल्याचे स्फोटक वास्तव समोर आले आहे. या प्रकरणात प्रशासनाची झोप उडाली असून संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर आता थेट कारवाईची तलवार लटकली आहे.

विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी स्पष्ट शब्दांत नमूद केले आहे की, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रकल्प संचालक यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करत कोणतीही ठोस कारवाई केली नाही. वारंवार पत्रव्यवहार करूनही प्रकरण दाबण्याचा प्रयत्न झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

या घोटाळ्यात ग्रामपंचायत स्तरावरील पदाधिकारी, संबंधित कर्मचारी आणि अधिकारी यांचा सहभाग असल्याचे आरोप असून, प्रकरण आता गुन्हा दाखल करण्याच्या टप्प्यावर पोहोचले आहे. त्यामुळे संबंधितांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. दरम्यान, या प्रकरणाने गंभीर वळण घेतले असून १७ एप्रिल २०२६ रोजी थेट मुख्य सचिवांच्या दालनात सुनावणी होणार आहे. संबंधित सर्व अधिकाऱ्यांना आवश्यक कागदपत्रांसह हजर राहण्याचे सक्त आदेश देण्यात आले आहेत.

अंतिम अहवाल सादर करण्यात उशीर झाल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा कडक इशारा प्रशासनाने दिला आहे. त्यामुळे आता या घोटाळ्यात आणखी कोण-कोण उघडकीस येणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## मिरा भाईंदर शहर मनसे नेत्या रेश्मा तपासे यांच्या मुलावर जीवघेणे हल्ला...

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.११, मिरा भाईंदर :** मिरा भाईंदरच्या मनसे महिला पदाधिकारी रेश्मा तपासे यांच्या मुलावर राजकीय वैमन्यषानिमित्त जीवघेणा हल्ला झाल्याची घटना दिनांक ९ रोजी घडली आहे. रेश्मा तपासे यांच्या मुलाला चॉपरने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे. या संदर्भात मिरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. त्यांचा मुलगा स्वप्नील हा मीरारोड येथिल मेडिटेक या खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहे. रेश्मा तपासे च्या म्हण्यानुसार काही मुले मुलींची छेड काढत होती. त्यांना रोकण्यासाठी गेल्यावर त्यांनी मारहाण करण्यास चालू केले. त्यांच्यातील

एका मुलाच्या हातात चॉपर होते. तो ही मारण्यासाठी पुढे येत होता. पण काहींनी त्याला पकडले म्हणून तो थांबला. मिरा रोड येथील नागरिक वस्ती मध्ये हा प्रकार घडला. त्यामुळे नागरिक ही चिंतेत आहेत.

रेश्मा तपासे या मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) राज्य उपाध्यक्षा तसेच मिरा भाईंदर उपशहर अध्यक्षा आहेत. त्यांचा सामाजिक प्रवास सर्वश्रुत आहे आणि त्यांनी समाजाच्या आणि जनसामान्यांच्या समस्या सोडविण्यासाठी नेहमीच पुढे असतात. मराठी विषयावर त्या तळमळीने बोलतात. त्यांनी अनेकदा भ्रष्टाचारावर ही आंदोलन केले आहे.

मिरा भाईंदर पोलीस आयुक्तालायाने चौकशी करून गुंडाना जबर बसवावी. रेश्मा तमासे कुटुंबियांना न्याय द्यावा अशी नागरिकांना अपेक्षा आहे.

## कोक गावात महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी




**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.११, जिंतूर :** जिंतूर तालुक्यातील कोक गावात आज महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याला आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी फुले यांच्या समता, शिक्षण व समाजउद्धाराच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे अनुसरण करण्याचे आवाहन केले. यावेळी उपस्थित सर्वांनी सामाजिक एकता व शिक्षणाचा प्रसार करण्याचा संकल्प केला.

या प्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य रामेश्वर जावळे, बाबाराव काठोडे, अशोक भुसारे, अक्षय जावळे, अनिल रासवे, राजू सोळंके, जनार्धन काठोडे, रामा बारवकर, विठ्ठल झाडे आदींसह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमात युवकांचा उत्साह मोठ्या प्रमाणात दिसून आला. संपूर्ण वातावरण फुले यांच्या विचारांनी भारावलेले होते.

## प्रत्येक नागरिकाला न्याय देणे, हीच खरी लोकशाहीची ताकद : आ. काशिनाथ दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर पळवे खु. मंडळातील वडनेर हवेली, ता. पारनेर येथे यशस्वीरीत्या संपन्न झाले. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले असून, विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना प्रत्यक्ष ठिकाणीच देण्यात आल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी आमदार काशिनाथ दाते म्हणाले, महसूल विभाग हा सर्वसामान्यांच्या दैनंदिन आयुष्याशी निगडित असून प्रशासन अधिक गतिमान व लोकाभिमुख करण्यासाठी अशा शिबिरांची गरज आहे. तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांच्या बहुतांश समस्या या रस्ते व जमीन विभाजनाशी संबंधित असतात. 'बळीराजा शेतपानंद रस्ते योजना' प्रभावीपणे राबवून या समस्यांवर कायम स्वरूपी तोडगा काढण्याचा शासनाचा प्रयत्न सातत्याने सुरुच आहे. आज राज्य, देश आणि जग झपाट्याने प्रगती करत असताना प्रशासनही तितक्याच वेगाने नागरिकांच्या सेवेत उभे राहिले पाहिजे. शासन व जनतेमधील दरी कमी करून प्रत्येक नागरिकाला न्याय देणे, हीच खरी लोकशाहीची ताकद आहे.

यासोबतच त्यांनी ग्रामपंचायतींच्या सक्षमीकरणासोबत नागरिकांच्या होत असलेल्या धावपळीवर व त्यातून त्यांना सामोरे जावे लागत असलेल्या मानस्तापावर उपाय योजना राबविणे गरजेचे असल्याचे सांगताना स्पष्ट केले की, प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालय सुसज्ज करून तेथेच डाटा एंट्री ऑपरेटरांना प्रोत्साहन दिल्यास, विविध दाखल्यांसाठी तालुक्याच्या ठिकाणी नागरिकांना करावी लागत असणारी धावपळ मोठ्या प्रमाणात कमी होईल. प्रशासन गावपातळीवर सक्षम होणे ही काळाची गरज असून उद्याच्या काळात त्यादृष्टीने विचार होणे गरज आहे आजवर अशा शिबिरांत प्रामुख्याने सत्ताधारी पदाधिकाऱ्यांनाच निमंत्रण दिले जाते, असे प्रकर्षाने जाणवले असून यापुढे या शिबिरांमध्ये सर्वपक्षीय माजी सरपंच, माजी पंचायत समिती सदस्य, माजी जिल्हा परिषद सदस्य अशा सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांना सहभागी करून घेतल्यास शासनाचा मूळ उद्देश अधिक प्रभावीपणे साध्य होईल.

कृषी विभागाच्या कामगिरीचे विशेष कौतुक करताना आमदार दाते सर म्हणाले, कृषी विभागाने आठशेहून अधिक शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसाठी अनुदान दिले असून, त्यांच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत असल्याचा आनंद शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर जाणवतो आहे. इतर विभागांच्या तुलनेत सर्वाधिक अनुदान वितरित करून शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेले कृषी विभागाचे कार्य कौतुकास्पद आहे.

कार्यक्रमास तहसीलदार गायत्री सौंदाणे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, कृषी अधिकारी गजानन घुले, नायब तहसीलदार दिपक कारखिले, सरपंच लहु भालेकर, युवती कार्याध्यक्ष सोनाली कुलथे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.११, नागपूर :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान टप्पा १ अंतर्गत खापरखेडा औष्णिक वीज मनोरंजन गृहात १० एप्रिल शुक्रवारला शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद बघायला मिळाला. शासनाच्या विविध योजने अंतर्गत जवळपास ६१७ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

शिबिराच्या अध्यक्षस्थानी सावनेरचे उपविभागीय अधिकारी कुश मोटवाणी विराजमान होते. तर तहसीलदार अक्षय पोयाम, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मनोज हिरुळकर, उप अधिक्षक भूमीलेख अधिकारी प्रमोद बोकडे, तालुका कृषी अधिकारी सोमनाथ साठे, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर लांडे, विदर्भ मच्छीमार संघटनेचे अध्यक्ष प्रेम गजभारे, भानेगाव सरपंच शालिनी चवरे, चिचोली



### ६१७ लाभार्थ्यांनी मिळाला शासकीय योजनांचा लाभ

(खापरखेडा) सरपंच मिनाक्षी तागडे, सिल्लेवाडा सरपंच मधुकर दुगाने, यांच्यासह तालुक्यातील सर्व प्रमुख विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

शिबिरादरम्यान महसूल विभागा मार्फत ५४ फेरफार प्रकरणे निकाली काढण्यात आली, १५ महसुली प्रकरणे निकाली काढून ७/१२ दुरुस्ती करण्यात आली, शिवाय ३८३ डिजिटल ७/१२ चे वाटप करण्यात आले. यावेळी सेतू मार्फत १०८ विविध प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आले. पुरवठा विभागा मार्फत २० नवीन शिधापत्रिका वाटप करण्यात आले तर २९ आधारकार्ड अपडेशनचे करण्यात आले. यावेळी संजय गांधी निराधार योजने अंतर्गत ८ प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

याप्रसंगी तहसीलदार अक्षय पोयाम यांनी शासनाने अकृषक परवानगी रद्द केली असून त्याऐवजी विकास परवानगी व अकृषक आकारणी जमा करण्यासंदर्भात त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच तालुक्यातील ६ मंडळांमध्ये १५ विविध सेवांचे कामकाज महाराजस्व अभियानांतर्गत होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उपविभागीय अधिकारी कुश मोटवाणी यांनी आपल्या अध्यक्ष भाषणात म्हणाले की, आम्ही शिबिरापूर्वी गावा गावात जाऊन नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या व त्यांच्याकडून अर्ज घेतले त्यामूळे ६१७ लोकांना थेट लाभ देणे शक्य झाल्याचे सांगितले.

शिबिरा दरम्यान विविध विभागा मार्फत स्टॉल लावून नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण केले तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली.

## पी.एम.श्री.अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळेत सामाजिक समता सप्ताहाचे आयोजन

**दि.११, चिमूर :** पी.एम.श्री. अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा, चिमूर येथे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने दिनांक ०८ एप्रिल २०२६ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत सामाजिक समता सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे.

या सप्ताहाचे उद्घाटन दिनांक ०८ एप्रिल २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. उदघाटनप्रसंगी विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी तालूका आरोग्य कर्मचारी यांचेकडून करण्यात आली. समाजात समता, बंधुता व न्याय यांची जाणीव विद्यार्थिनींमध्ये निर्माण व्हावी या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक ०९ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. तसेच



२०२६ हे वर्ष महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त विद्यार्थिनींमध्ये जागृती निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला.

दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित निबंध स्पर्धा घेण्यात आली. त्यानंतर दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन करण्यात येणार आहे.

याचबरोबर दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी जेष्ठ नागरिकांसाठी जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, समाजातील सर्व घटकांमध्ये जागरूकता वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, सप्ताहाचा समारोप उत्साहात करण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता खोब्रागडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक शिक्षक प्रिया बोरकर, विनय खापर्डे, दत्तात्रय पुलेनवार, अनुराधा महाजन, राजरत्न गजभिये, पंकज काळे, ज्योत्स्ना नेऊलकर व प्रतिक्षा घ्यार हे परिश्रम घेत आहेत. सामाजिक समता सप्ताहामुळे विद्यार्थिनींमध्ये सामाजिक जाण, समता व मानवतेचे मूल्य अधिक दृढ होण्यास निश्चितच मदत होणार आहे.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात महात्मा फुलेंची जयंती उत्साहात साजरी

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.११, राहुरी विद्यापीठ :** आपल्या विद्यापीठाला महात्मा जोतिराव फुले यांचे नाव मिळाले असून हे आपले भाग्यच आहे. आपल्या विद्यापीठाचा देशातच नव्हे तर देशाबाहेरही नावलौकिक आहे. महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षण, समता आणि शेतकऱ्यांसाठी लढा दिला. त्यांच्या विचारांनी भारतीय समाज व्यवस्थेला नवी दिशा दिली. आजचे युग हे विज्ञानाचे व गतिमान संशोधनाचे आहे. या गतिमान युगात आजही त्यांचे विचार प्रेरणादायी आणि दिशादर्शक आहे असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राष्ट्रीय सेवा योजना संचालनालय आणि विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालयाच्या वतीने डॉ. नानासाहेब पवार सभागृहात





महात्मा जोतीबा फुले यांची १९९ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. सचिन सूर्यवंशी उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर संचालक विस्तार शिक्षण डॉ. गोरक्ष ससाणे, प्रक्रिया अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, उपकुलसचिव श्री. व्ही. टी. पाटील, कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्राचे प्रमुख डॉ. पंडित खर्डे, कार्यक्रमाचे आयोजक राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विलास आवारी उपस्थित होते.

# दीक्षाभूमीच्या विकासकामाला मिळणार गती; तांत्रिक अडचणी होणार दूर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** चंद्रपूर येथील पवित्र दीक्षाभूमीच्या सर्वांगीण विकासाला गती देण्याच्या दृष्टीने आ. किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून महत्त्वपूर्ण हालचालींना वेग आला आहे. त्यांच्या सूचनेनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल सोसायटीच्या सदस्यांनी आज वर्धा येथे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या बैठकीत प्रलंबित तांत्रिक अडचणी दूर होताच तातडीने विकासकामाला सुरुवात करण्यात येईल, असे आश्वासन मंत्री सिरसाड यांनी दिले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल सोसायटीचे सचिव वामराव मोडक, प्रा. मनोज सोनटक्के, प्रा. दिलीप रामटेके आदींची उपस्थिती होती.



चंद्रपूर येथील दीक्षाभूमी हे ऐतिहासिक व प्रेरणादायी स्थळ असून, नागपूरनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी येथेही दीक्षा दिली होती. त्यामुळे या पवित्र स्थळाच्या विकासाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर आ. किशोर जोरगेवार यांनी या ठिकाणाचा सर्वसमावेशक विकास व्हावा यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला आहे. या विकासकामांसाठी पहिल्या टप्प्यात सुमारे ५६ कोटी ९० लाख रुपयांचा निधी आ. जोरगेवार यांच्या अथक प्रयत्नांतून मंजूर करण्यात आला आहे.

दरम्यान, या विकासकामाच्या अंमलबजावणीत काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने कामात अडथळे येत होते. या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय बाबींवर या बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली. प्रकल्पाशी संबंधित तांत्रिक मुद्द्यांचा आढावा घेत त्यावर तातडीने तोडगा काढण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी या प्रकल्पाबाबत गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देत कामांना गती देण्याचे निर्देश दिले. तसेच, दीक्षाभूमीच्या विकासासाठी शासन स्तरावरून सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

आ. किशोर जोरगेवार यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे चंद्रपूर दीक्षाभूमीच्या विकासकामांना लवकरच गती मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर चंद्रपूर जिल्ह्याच्या सांस्कृतिक, धार्मिक व पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळणार असून, देशभरातील अनुयायांसाठी हे ठिकाण अधिक आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.

# आमच्या घामाचा पैसा आम्हाला परत द्या !

## पारनेर तालुक्यातील सेनापती बापट मल्टीस्टेटच्या ठेवीदारांचा आक्रोश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्याच्या सहकार क्षेत्रातील संकट अधिक गडद झाले आहे. तालुक्यातील सेनापती बापट मल्टीस्टेटमध्ये आपले कष्टाचे गुंतवलेले पैसे दोन वर्षांपासून परत मिळत नसल्याने ठेवीदार नुकतेच रस्त्यावर उतरले होते. पारनेर बाजार तळावर झालेल्या आंदोलनात सहभागी झालेल्या शेतकरी, कष्टकरी आणि निवृत्त कर्मचार्यांच्या डोळ्यातील अश्रू हे केवळ आर्थिक नुकसान नाही, तर एका विश्वासाचा पूर्णपणे अंत झाल्याचे प्रतीक आहेत, अशी भावना आंदोलकांनी व्यक्त केली.

आम्ही पतसंस्थेचे आकडे बघून नाही, तर माजी आमदार विजयराव औटी यांच्या नावावर आणि शब्दावर विश्वास ठेवून आयुष्यभराची पुंजी इथे ठेवली होती, असे आंदोलकांनी सांगितले. आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व लोकांमध्ये एकच सूर होता – ज्या विश्वासाने आम्ही पैसे ठेवले, त्याच विश्वासाने आता साहेबांनी पुढाकार घेऊन आमचे पैसे मिळवून द्यावेत. छोटे व्यापारी, सरकारी नोकरदार आणि ज्यांच्या संसाराची गाडी व्याजावर चालत होती, अशा वृद्धांची दुर्दशा पाहणे खूप कठीण आहे. त्यांच्या कुटुंबाच्या जीवनाची गाडी अडचणीत आली आहे.



आंदोलनाचे नेतृत्व करणारे राजू औटी यांनी ठेवीदारांच्या भावनांना वाट करून दिली. ते म्हणाले, गेल्या दोन वर्षांपासून केवळ आश्वासनांच्या पलीकडे काहीही मिळाले नसल्याने आता केवळ तोंडी चर्चा नाही, तर खासदार, आमदार, पालकमंत्री आणि थेट दिल्लीपर्यंत लेखी निवेदने दिली जाणार आहेत. आम्हाला ठोस निर्णय आणि कृती पाहिजे, अशी भावना आंदोलकांनी व्यक्त केली. पारनेर निबंधक कार्यालयासमोर लवकरच साखळी उपोषण करून प्रशासनाचे लक्ष वेधले जाईल. कोणाचे मुलीचे लग्न थांबले आहे तर कोणाच्या औषधोपचाराचा प्रश्न आहे,हा केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर हजारो कुटुंबांच्या जगण्याचा जीवनमरणाचा प्रश्न आहे, आमच्या ठेवी आम्हाला मिळाव्यात ही एकच मागणी घेऊन पारनेरचा सामान्य माणूस आज न्यायाच्या प्रतीक्षेत आहे,असेही राजू औटी म्हणाले.

# टाकळीढोकेश्वर येथील महादेव मंदिरात चोरी; भाविकांमध्ये संताप

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यात सर्वत्र गेल्या काही दिवसांपासून चोऱ्यांचे सत्र वाढले असून चोरट्यांनी मंदिरांनाही लक्ष्य करणे सुरू केले असून मंदिर देखील आता सुरक्षित राहिले नसल्याचा अनुभव पुन्हा एकदा आला आहे. पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील पुरातन महादेव मंदिरातील पिंडीवरील तांब्याची नागफणी यासह त्रिशूल व पितळी समया, तांब्याचे पूजेचे ताट घंटा अज्ञात चोरट्यांनी चोरुन लंपास केला. ही धक्कादायक घटना बुधवारी रात्री झाल्याचे समोर आले आहे. महादेव मंदिरात चोरी झाल्याच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार टाकळी ढोकेश्वर येथिल बांडे मळा रस्त्यावरील आहेरओढा भागात पुरातन महादेव मंदिर आहे. या मंदिरात ८ एप्रिलच्या रात्री झालेल्या चोरीत अज्ञात चोरट्यांनी मंदिरातील तांबे पितळाच्या वस्तू चोरून नेल्या. चोरटे गावांमध्ये फिरत टेहळणी करत असतात. बंद घरांमध्ये चोरी करण्यासोबतच गावातील मंदिरांमध्ये देखील चोरी करत आहेत. यामुळे मंदिरे देखील सुरक्षित नसल्याची चर्चा आता होऊ लागली आहे.

गुरुवारी (दि.९) रोजी सकाळी शिवाजी पायमोडे (मेजर) हे येथील महादेव मंदिरात दर्शन घेण्यासाठी आले असता हा प्रकार उघडकीस आला. त्या वेळी तेथे चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. याच दरम्यान अजून काही भाविक आले असता त्यांनाही नागफणी व घंटा व इतर वस्तू चोरी झाल्याचे दिसून आले. यानंतर संपूर्ण गावात चोरी झाल्याची बातमी पसरली. यावरून नागरिकांची घरे असुरक्षित असण्यासोबतच आता मंदिरेही चोरट्यांच्या रडारवर असल्याचे दिसून येत आहे. पोलीस प्रशासनाने याकडे विशेष लक्ष पुरविण्याची मागणी होत आहे. शिवाजी पायमोडे (मेजर) आणि शिवाजी बांडे यांनी तातडीने पारनेर पोलीस स्टेशन अंतर्गत टाकळी ढोकेश्वर पोलिस दुरक्षेत्र पोलिस कॉन्स्टेबल मच्छिंद्र खेमनर यांना याबाबतची माहिती दिली. सदर चोरट्यांना कायमस्वरूपी बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# राजकारणाच्या पलीकडे एकतेचा उत्सव; पारनेरमध्ये फुले विचारांना सर्वधर्मीय सलाम !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त पारनेर येथे सर्वधर्मीय व सर्वपक्षीय एकोप्याचे अभूतपूर्व दर्शन घडले. शनिवारी पार पडलेल्या या उपक्रमात राजकीय व सामाजिक भेद बाजूला ठेवत शहरातील नागरिकांनी एकत्र येत समता, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. कार्यक्रमाची सुरुवात पारनेरचे ग्रामदैवत रोकडेश्वर हनुमान मंदिर येथे अभिवादन करून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण तसेच नुरशाबाबा पिर येथे चादर समर्पित करून करण्यात आली. या कृतीतून सर्वधर्मसमभावाचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला. शहरातील गायकवाड, व्यवहारे, चौरे, विधाटे, नाईक, लोंढे आदींसह माळी समाज बांधवांनी पुढाकार घेत, तालुका व जिल्ह्यातील अनेक ज्येष्ठ मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली हा अनोखा उपक्रम यशस्वीपणे पार पाडला.

या प्रसंगी नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांच्यासह पारनेर शहर, तालुका व जिल्ह्यातील विविध पक्षांची विविध संघटनेचे व विविध धर्माचे, विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, पारनेर नगरपंचायत चे आजी माजी नगरसेवक सेवा सोसायटीची चेअरमन प्रतिष्ठित मान्यवर व यशस्वीरित्या नियोजन करणारे माळी समाज बांधवांचे सर्व युवा सहकारी व पदाधिकाऱ्यांची उल्लेखनीय उपस्थिती होती. अनेक मान्यवरांनी आपल्या मनोगतातून महात्मा फुले यांच्या समतेच्या विचारांचा जागर करत समाजाला एकतेचा संदेश दिला.



संपूर्ण कार्यक्रम सौहार्द, समता व बंधुभावाच्या वातावरणात पार पडला. ही केवळ जयंती नव्हे, तर समतेच्या विचारांची पुनर्स्मृती ठरली .जिथे भेद मिटले, मनं जुळली आणि मानवतेचा खरा उत्सव साजरा झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बबन चौरे यांनी केले, तर आभार शाहीर मामा गायकवाड यांनी मानले.

# थोडक्यात

## महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खापरखेडा येथील विद्यार्थ्यांना SWADHA फाउंडेशन ची शिष्यवृत्ती...



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.११, नागपूर :** आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु अभ्यासात प्रगतीशील असलेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या **SWADHA** फाउंडेशनतर्फे दरवर्षी दहावी उत्तीर्ण होऊन अकरावीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती परीक्षा आयोजित केली जाते. या परीक्षेत यशस्वी ठरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाचा संपूर्ण खर्च संस्था उचलते.

यावर्षी झालेल्या या शिष्यवृत्ती परीक्षेत महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खापरखेडा येथील अकरावी वर्गातील कु. हर्षला चटप, कु. अक्षरा गजभिये, अंश मेश्राम, व प्रसिक पाटील हे चार विद्यार्थी पात्र ठरले असून त्यांना पुढील शिक्षणासाठी संस्थेकडून शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे.

शिष्यवृत्तीस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना प्राचार्य अरुण वडस्कर, उपप्राचार्य चंद्रशेखर लिखार, पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे, प्रा.विजय टेकाडे, प्रा.श्वेता रोकडे यांच्याद्वारा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तसेच त्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## १६ एप्रिल रोजी खापरखेड्यात डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त प्रबोधनाचा जागर



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.११, नागपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त खापरखेडा येथे सामाजिक जनजागृतीसाठी विशेष प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम ‘कोशिश फाउंडेशन’च्या वतीने गुरुवार, १६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता आयोजित करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम चनकापूर परिसरातील वॉर्ड क्रमांक १ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान (गार्डन), तुलसी मंगल कार्यालयाजवळ पार पडणार आहे. या कार्यक्रमात सप्तखंजिरी वादनाच्या माध्यमातून प्रबोधन करणारे सत्यपाल महाराज यांचे शिष्य पवनपाल महाराज वडाळीकर (ता. आकोट, जि. अकोला) यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री सुनील केदार राहणार असून माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रामटेक लोकसभा मतदारसंघाचे खासदार शामकुमार बर्वे, चिचोलीच्या सरपंच मीनाक्षी तागडे, सावनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवींद्र चिखले, सिललेवाडा येथील सरपंच मधुकर दूगाणे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश खापरे, माजी सभापती अरुणाताई शिंदे (सावनेर पंचायत समिती), माजी उपसभापती राहुल तिवारी, माजी जिल्हा परिषद सदस्य सलील देशमुख, पोटाचे माजी सरपंच पवन धुर्वे तसेच खापरखेडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हरीश रूमकर यांची उपस्थिती राहणार आहे.या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक कपिल वानखेडे (कोशिश फाउंडेशन) आणि भीमराव तागडे शेतकरी हॉल व पंचशील डेकोरेशन यांचे सहकार्य लाभत आहे. याशिवाय राकाचे नेते अमर जैन, दिवाकर घेर, कृष्णा नमलेवार, उदय महाजन, धनराज डेहरिया यांच्यासह अनेक कार्यकर्ते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार आणि समाजात जनजागृती घडविण्याच्या उद्देशाने आयोजित या प्रबोधन कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## टाकळी ढोकेश्वर येथे महात्मा फुले यांना अभिवादन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल ग्रामपंचायत कार्यालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. जयंतीनिमित्त सन २०२६ – २०२७ वर्षे राज्यात द्विशताब्दी वर्षभर उत्साहात साजरे करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. गोरगरीब व महिलांसाठी, सर्वसामान्यांसाठी शिक्षणाचे दार खुले करण्यास महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे योगदान खूप मोठे आहे. त्यांचा हा वारसा आपण सर्व जण मिळून पुढे घेऊन जाऊया हा संकल्प ग्रामपंचायतीच्या वतीने केला.

या प्रसंगी सरपंच अरुणा खिलारी, ग्रामपंचायत सदस्य बापूसाहेब रांधवण, सोवा सोसायटीचे संचालक बबन पायमोडे साहेब ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब दावभट, मंडळ अधिकारी जगन्नाथ भालेकर, वैभव उरमुडे तलाठी, अंकुश पायमोडे,मळिभाऊ रांधवण, पत्रकार वसंत रांधवण, ग्रामपंचायत लिपिक लखन आल्हाट,शुभम कुटे अंगणवाडी सेविका शोभा हिरे, सुलोचना आल्हाट उपस्थित होते.

## विंचूर येथे महात्मा फुले यांना विनम्र अभिवादन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.११, विंचूर (नाशिक) :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विंचूर येथील सावता महाराज मंदिरात अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. आधुनिक भारताचे थोर समाजसुधारक महात्मा फुले यांच्या ऐतिहासिक कार्याचा गौरव करत, त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी विनम्र अभिवादन केले.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सरपंच सचिन दरेकर म्हणाले की, महात्मा फुले यांनी शिक्षण, समता आणि सामाजिक न्यायासाठी आपले आयुष्य वेचले. त्यांनी पेटवलेली ज्ञानाची ज्योत आज घराघरात पोहोचली आहे. त्यांच्या क्रांतीकारी विचारांचा समाजाने केवळ आदरच करू नये, तर ते विचार प्रत्यक्ष जीवनात अंगीकारणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

इतर मान्यवरांनीही आपल्या मनोगतातून महात्मा फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला. आजच्या आधुनिक काळातही त्यांचे विचार समाजाला दिशा देणारे आणि प्रेरणादायी असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.